१२/१/२२

**इ वे बिल बाबत बरेच काही.....**

**अमित लुल्ला**

वस्तू आणि सेवाकर कायद्या अंतर्गत दिनांक १.४.२०१८ पासून अमलात आणलेल्या ई वे बिल काढण्याच्या प्रक्रियेमध्ये दि. १.१.२०२२ पासून गंभीर आणि मूलगामी बदल केले असल्याने आणि या छोट्याश्या बदलाचा देखील खूप मोठा परिणाम होणार असल्याने पूर्वीच्या आणि नव्या तरतुदींचा येथे उल्लेख करीत आहे.

१) नवीन बदल येण्यापूर्वी, जीएसटी अधिकाऱ्याने जर रस्त्यावर ट्रक आडवला तर त्यावेळच्या कायद्यामध्ये तरतुदी काय होत्या याचा प्रथम उल्लेख करणे उचित ठरेल. ज्यावेळी सक्षम अधिकाऱ्यास ट्रक ड्रायव्हर कडील विक्रीचे बिल,ई वे बिल यामध्ये काही चूक आढळल्यास किंवा वस्तुंच्या प्रमाणात आणि मालाच्या वर्णनामध्ये फरक आढळल्यास तो माल आणि ट्रक जागेवरच जप्त करण्याचा अधिकार आहे. अशावेळी अधिकारी जीएसटी कायद्याप्रमाणे होणारा कर आणि कराएवढ्याच रकमेचा दंड भरावयास सांगतो. तोपर्यंत माल सोडला जात नाही. जर सदर मालाच्या मालका व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती हा माल सोडवण्यास आली तर मालाच्या किंमतीमधून त्या मालाच्या कराची रक्कम वजा करून जेवढी रक्कम शिल्लक राहते तेवढा दंड आकारला जातो. सदरची रक्कम किंवा त्या रकमेइतका बॉन्ड दिल्यास माल सोडवून घेता येतो. अशा तरतुदींमुळे ज्यावेळी ट्रक पकडला जातो त्यावेळी ट्रक मालक किंवा सक्षम अधिकार असलेली व्यक्ती त्यावेळी कसा जबाब देते आणि त्यानंतर तत्काळ कशी पावले उचलली जातात यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून राहतात. सर्वसामान्यपणे असे अनुभवास येते की एकदा माल सोडवल्यानंतर अधिकाऱ्यांनी दिलेल्या कर आणि दंडाच्या निकालाविरुद्ध अपील दाखल केले जाते. अशावेळी वाद अगर म्हणणे असे मांडले जाते की एकाच पुरवठ्यावर दोन वेळा कर लावता येणार नाही. अपील करणाऱ्यांचे म्हणणे मान्य झाल्यास कराची रक्कम परत मिळू शकते. परंतु दंडाचा परतावा हा कोणत्या प्रकारची आणि कशा प्रकारे कारणे दाखवा नोटीस काढलेली आहे, त्याला उत्तर कशा पद्धतीने दिले आहे आणि प्रत्यक्ष सुनावणीवेळी मुद्दे कशा प्रकारे मांडले जातात यावर अवलंबून राहतो. जर कर देयता बॉन्ड किंवा सेक्युरिटीने भागविली असेल तर अपील करण्यापूर्वी जेवढा कर भरणा आहे त्याच्या दहा टक्के रक्कम भरावी लागते. जर वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिसाद न दिल्यास संपूर्ण माल जप्त होऊ शकतो आणि त्या मालाचा आणि ट्रकचा लिलाव पुकारून जीएसटीची रक्कम वसूल केली जाऊ शकते.

२) १ जानेवारी २०२२ पासून या तरतुदींमध्ये काही बदल करण्यात आले. त्या अनुसार आता कर आणि दंड भरण्याऐवजी जेवढा कर होतो त्याच्या दुप्पट रक्कम दंड (२००% )म्हणून भरावी लागेल. म्हणजे कर भरण्याची रक्कम शून्य राहील आणि संपूर्ण रकमेची गणना दंड या संज्ञेत होईल. याचा परिणाम असा होईल की ज्यावेळी आपण परताव्यासाठी अर्ज कराल त्यावेळी एक तर संपूर्ण दंडाची रक्कम परत मिळेल किंवा काहीही परत मिळणार नाही. यापूर्वी किमान कराची रक्कम परत मिळत होती. कलम १२९ ची कलम ६७ पासून फारकत केल्यामुळे आता माल सोडवण्याकरता बॉन्ड देखील देता येणार नाही. संबंधित मालाच्या मालकाऐवजी दुसरी कोणतीही व्यक्ती माल अगर ट्रक सोडविण्यासाठी गेल्यास दंडाची रक्कम ही कराच्या रकमेएवढी(१००%) राहील.

३) याचा अर्थ असा आहे की यापुढे अत्यंत खबरदारी आणि जबाबदारीने ई वे बिल काढावे लागेल. यासाठी मालकांनी स्वतः लक्ष घालणे जरुरीचे आहे. जर अकाउंटट आणि ट्रान्सपोर्टवाल्यावर अवलंबून राहिले आणि त्यामध्ये जर काही चुका झाल्या तर खूप मोठ्या भुर्दंडास तोंड द्यावे लागेल.

४)सध्या जीएसटीआर-१ आणि ई वे बिल मध्ये फरक असल्याच्या नोटिसा देखील निघू लागलेल्या आहेत. न

काढलेल्या प्रत्येक इ वे बिलासाठी कलम १२२ प्रमाणे रुपये १०,००० दंडाची तरतूद आहे. याचा अर्थ जर १८-१९,१९-२० आणि २०-२१ या वर्षासाठी तपासणी झाली आणि जर त्यामध्ये असे लक्षात आले की सुमारे ५० विक्रीच्या बिलांसाठी इ वे बिल काढलेले नाहीत तर त्याला रुपये ५,००,००० दंड सक्षम अधिकारी लावू शकतो. अशावेळी इतर कागदपत्र जरी दाखविले आणि कर चुकविला नाही असे जरी ध्यानात आणून दिले तरी तो ऐकेलच असे नाही. वास्तविक ही चूक तांत्रिक स्वरूपाची असल्याने अशा प्रकारच्या व्यवहारांवर दंड लागू नये असे अनेक न्यायनिवाडे आहेत. व्यापाऱ्यास ते सादर करावे लागतील. तसेच याकरिता कायद्यात बदल करणे अत्यावश्यक आहे.

इ वे बिल आणण्यामागील भूमिका ही बिन बिलाने धंदा करणारे तसेच हवाला व्यापाऱ्यांवर वचक बसावा ही जरी असली तरी त्यामुळे प्रामाणिक व्यापाऱ्यांना तसेच छोट्या-मोठ्या तांत्रिक चुकांकरता त्रास होऊ नये याकडे सरकारचे लक्ष वेधले पाहिजे.